


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३५
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.१६ जुलै २०२५


## रायगडमध्ये धुंवाधार पाऊस, पूरसदृश्य परिस्थिती ! घरांचे नुकसान

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१५, रायगड :** रायगड जिल्ह्यात पडलेल्या पावसामुळे दोन घरांचे, तसेच एका पक्क्या घराचे अंशत: नुकसान झाले आहे. महाड तालुक्यातील शिंगरकोंड येथील सुरेश गणपत भोसले (वय ५८ वर्षे) यांचा गावाजवळून जाणाऱ्या नदीमध्ये पाय घसरून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली आहे.

रायगड जिल्ह्यात सध्या काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपात पाऊस सुरु असून परिस्थिती नियंत्रणात आहे. जनजीवन सामान्य होत आले आहे. रायगड पाटबंधारे विभाग कोलाड यांचेकडे सांयकाळी सहाच्या अहवालानुसार अंबा नदीने धोका पातळी ओलांडली असून कुंडलिका नदी इशारा पातळीवर वाहत आहे. उर्वरित नद्या इशारा पातळीपेक्षा कमी प्रवाहात वाहत आहेत.



जिल्हा प्रशासनाने सर्व शासकीय यंत्रणा व नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाच्या माहितीप्रमाणे प्रमुख रस्ते व रेल्वेमार्गावरील वाहतूक सुरळीत सुरु आहे. तथापि जिल्ह्यातील काही रस्ते व पुलावरून पाणी ओसरल्यामुळे काही रस्ते सुरु करण्यात आले आहेत.

रायगड जिल्ह्यातील तळा तालुक्यातील संगम पुलावरील पाणी ओरसले असून वाहतूक सुरु करण्यात आली आहे. महाड तालुक्यातील शिंगरकोंड येथील सुरेश गणपत भोसले यांचा गावाजवळून जाणाऱ्या नदीमध्ये पाय घसरून पडून मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना घडली आहे.

सावित्री नदीचे पाणी महाड शहरात शिरले होते महाड शहरातील रावढळ पुलावरील पाणी ओसरले असल्याने वाहतूक सुरु करण्यात आली आहे. विन्हेरे विभागातील नागेश्वरी नदीपात्र तुडुंब भरलेले होते. सदर गावातील मल्लिकार्जुन मंदिराजवळील पुलावरील पाणी ओसरले असून पुलावरील वाहतूक सुरु करण्यात आली आहे.

महाड शहरांमधील रायगडकडे जाणाऱ्या दस्तुरी मार्गावरील पाणी ओसरल्याने वाहतूक सुरु करण्यात आली आहे. सांदोशी सावरड रोडवर पडलेलं झाड हटविण्यात आले असून वाहतूक सुरळीत सुरु आहे.

रोहा तालुक्यातील भिसेखिंड येथे रस्त्यावर आलेले झाड जेसीबीच्या सहाय्याने बाजुला करण्यात आले आहे. वाहतूक सुरु करण्यात आली आहे. रोहा भालगाव रस्त्यावर तांबडी, मिसेंखिंड, मढा, महाळुंगे, कुभोशी याठिकाणी काही प्रमाणात माती रस्त्यावर आली होती, जेसीबीच्या सहाय्याने माती बाजुला करण्यात आली आहे. वरसे-भुवनेश्वर या परिसरातील काही घरांमध्ये शिरलेले पाणी ओसरले आहे. नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहेत. महादेव खार येथे रस्त्यावरील दरड हटविण्यात आल्याने वाहतूक सुरु करण्यांत आली आहे. आंबेवाडी-कोलाड नाक्यावर काही दुकानांत शिरलेले पाणी ओसरले आहे.

नागोठणे जवळील चिकणी ते रेल्वे ब्रीजपर्यंत साचलेले पाणी ओसरत आहे. शिरवली गावामधील पाणी ओसरले आहे. धर्मीबाई बाबुराव शिर्के (रा. बौद्धवाडी ता. रोहा) यांचे घराचे अंशतः नुकसान झाले आहे. पोलादपूर तालुक्यातील आंबेनळी घाटामध्ये बरेच ठिकाणी माती व दगड रस्त्यावर आली असल्याने सुरक्षेच्या कारणांमुळे आंबेनळी घाटातील वाहतूक १५ ऑगस्टपर्यंत बंद करण्यात आली आहे. भोराव-सवाद, धारवली, माटवण येथील पाणी ओसरले आहे. ओंबळी गावामध्ये काही घरांजवळ माती घसरली आहे. जिवीत हानी नाही. जेसीबीच्या साहाय्याने माती बाजुला सारण्यात आली आहे.

अलिबाग तालुक्यातील रामराज पुलावरील पाणी ओसरले आहे. अलिबाग बाजारपेठेत पाणी ओसरले आहे. म्हसळा तालुक्यातील ढोरजे येथे नदीपुलावरून मोठ्या प्रमाणात पाणी ओसरले असून वाहतूक सुरु करण्यात आली आहे. सुधागड तालुक्यातील मौजे वावळोली येथील सुभाष मारुती महाले यांचे घराची भिंत कोसळून अंशतः पक्के घराचे नुकसान झाले आहे. श्रीवर्धन तालुक्यातील रानवली येथे एक कच्चे घर पडलं आहे.

## चारा छावण्यांचे अनुदान लवकर देण्याची आ.आवताडे यांची मागणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१५, पंढरपुर :** मंगळवेढा तालुक्यात चालवण्यात आलेल्या छावणी मालकांना देण्यात येणारे अनुदान अद्याप अदा करण्यात आलेले नाही. तरी गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारे छावणी अनुदान मिळेल या प्रतिक्षेत असणाऱ्या तत्कालीन छावणी चालक मालकांना हे बिल देण्यात यावे अशी मागणी पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार समाधान आवताडे यांनी विधिमंडळ पावसाळी अधिवेशन दरम्यान केली आहे केली आहे.

यासंदर्भात आमदार समाधान आवताडे यांनी प्रश्न उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधले, तसेच लवकरात लवकर निधी वितरित करण्याची मागणी केली. आमदार आवताडे यांच्या या मागणीवर सकारात्मक प्रतिसाद देत



राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद पाटील यांनी येत्या सात दिवसांत निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट केले आहे.

तत्कालीन दुष्काळी परिस्थितीमध्ये या छावणी चालकांनी तालुक्यात मोठ्या प्रमाणात असणारे पशुधन जगण्यासाठी स्वखर्चाने छावण्या चालवून अनेक पशुपालक शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला होता.

> गेल्या अनेक वर्षांपासून छावणी कालावधीत खर्ची केलेले अनुदान आज ना उद्या मिळेल या आशेवर आम्ही सर्व छावणी चालक जगत आहोत. मतदार संघाचे आमदार समाधान आवताडे यांनी आमच्या भावना लक्षात घेऊन या मागणीवर शासन दरबारी वेळोवेळी आवाज उठवला आहे. आमदार आवताडे यांच्या या संवेदनशील नेतृत्वामुळे छावणी चालकांना वेळोवेळी दिलासा प्राप्त झाला आहे-
>
> **निलेश आवताडे, छावणी चालक, आंधळगाव**

त्यामुळे सध्या मोठ्या आर्थिक विवंचनेत सापडलेल्या या छावणी मालकांची आर्थिक बाजू लक्षात घेऊन त्यांना त्यांचे बिल तात्काळ देण्यात यावे अशी मागणी आमदार समाधान आवताडे यांनी केली आहे.

## खंडणी वसूल करणाऱ्या तोतया पोलिसांच्या टोळीला मुद्देमालासह अटक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, मुल (चंद्रपूर) :** भरारी पोलीस असल्याची बतावणी करून खंडणी वसूल करणाऱ्या तोतया पोलिसांच्या टोळीला मूल पोलिसांनी जेरबंद केले.

आरोपींमध्ये एक महिलासह चार आरोपींचा समावेश असून १३ लाख १० हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बादल दुर्गाप्रसाद दुबे (३६), संगीता बादल दुबे (२७), रा. रेंगेपार, ता. साकोली, जि. भंडारा, अजय विजय उईके (३१) , रा. गजानन मंदिर रोड, शितला माता मंदिरच्या मागे चंद्रपूर असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अन्य एक आरोपी देवेंद्र चरणदास सोनवणे (३०), रा. निलज, ता. साकोली, जि. भंडारा, ह.मु. भिवापूर वॉर्ड चंद्रपूर हा फरार आहे. आरोपींनी ३ जुलै रोजी मूल तालुक्यातील चिरोली येथील सुरेश लक्ष्मण गणमेनवार यांच्या घरी एमएच ३४ सीजी ५८२४ क्रमांकाच्या कारने जाऊन चंद्रपूरचे पोलीस भरारी पथक असल्याची बतावणी करून विनापरवाना सुरू असलेल्या दारूविक्रीवर कार्यवाही करण्याची धमकी दिली. यावेळी कारवाई न करण्यास १५ हजार रुपयांची मागणी करून तडजोडअंती १० हजारांची खंडणी मागितली. तसेच डोंगरगाव येथील एजाज शेख इब्राहिम शेख यांच्या अंडा-आमलेट दुकानात जाऊन दुकानात दारू पिणारे व्यक्ती आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची धमकी देऊन त्यांना १० हजारांची खंडणी मागितली.

दरम्यान, तोतया पोलिसांची टोळी असल्याचे निदर्शनास येताच सुरेश गणमेनवार व शेख इब्राहिम शेख यांनी १३ जुलैला मूल पोलिसांत तक्रार नोंदविली. पोलिसांनी अपराध क्रमांक २५३/२०२५ कलम ३०८ (२), २०४, ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा नोंदविला. सदर गुन्ह्याच्या तपासात मूल पोलिसांनी आरोपी निष्पन्न करून बादल दुबे, संगीता दुबे, अजय उईके यांना अटक केली. तर देवेंद्र सोनवणे हा फरार आहे. आरोपी कडून एक कार, तीन मोबाईल व नगद १५ हजार रुपये असे एकूण १३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आले.

सदर कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक ईश्वर कातकडे, प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सुधाकर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार विजय राठोड यांच्या नेतृत्वात साहाय्यक पोलीस निरीक्षक सुबोध वंजारी, पोहवा जमीर खान पठाण, पोहवा भोजराज मुंडरे, नापोअं चिमाजी देवकते, पोअं नरेश कोडापे, पोअं शंकर बोरसरे, पोअं संदीप चुधरी सह आदींनी केली आहे.

## कन्नड शहराच्या वाढीव पाणीपुरवठ्यासाठी प्रस्ताव सादर करावा : मंत्री गुलाबराव पाटील

**दि.१५, मुंबई :** कन्नड शहरात पाणीपुरवठा नियमित व योग्य प्रमाणात व्हावा यासाठी अंबाडी योजना तसेच शिवना टाकळी माध्यम प्रकल्प अशा दोन्ही योजनांचे प्रस्ताव सादर करावेत, असे निर्देश पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी दिले.



मंत्रालयात आयोजित बैठकीत नगरोत्थान महाअभियानांतर्गत अंबाडी पाणीपुरवठा योजनेऐवजी शिवना टाकळी प्रकल्पातून वाढीव पाणीपुरवठा करण्यासंदर्भात चर्चा झाली. या बैठकीस आमदार संजना जाधव, माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, पाणीपुरवठा विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सदस्य सचिव रंगा नाईक व अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

कन्नड शहराच्या नागरिकांसाठी वाढत्या गरजेनुसार योग्य व शाश्वत पाणीस्रोतांचा विचार करून, दोन्ही प्रस्ताव शासनाकडे सादर करावेत, असेही मंत्री श्री. पाटील यांनी यावेळी स्पष्ट केले.

## थोडक्यात

### विंचूरला जुगार खेळणारे चौघे पोलिसांनी केले जेरबंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१५, विंचूर (नाशिक ) :** विंचूर येथे लासलगाव पोलीसांनी जुगारीयांवर केली कारवाई. चार युवक जुगार खेळत असताना पोलिसांच्या निदर्शनास आले. आणि मजहर सलिम शेख (३६) रा. मदिना चौक, विंचूर ता.निफाड, अविनाश उत्तम डुंबरे (४५) रा. पांडुरंग नगर, विंचूर ता. निफाड, गणेश भगतसिंग काय कायस्थ (४२) रा.ग्रामपालिका विंचूर जवळ ता.निफाड, चेतन वसंतराव कुलकर्णी(३५) रा. कृष्ण नगर, विंचूर ता.निफाड यांना केले जेरबंद. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्याला मिळालेली माहिती अशी की, विंचूर रामवाडी पुलाजवळ काही व्यक्ती जुगाराचे साहित्य जवळ बाळगून जुगार खेळत असल्याची माहिती लासलगाव पोलीस स्टेशनला कळली. नंतर पो. अविनाश सांगळे, पो.सागर आरोटे, पो. सुजय बारगळ यांनी त्या ठिकाणी जाऊन छापा टाकला. कारवाई करीत जुगार खेळणाऱ्या चौघांना ताब्यात घेत जुगारीचे साहित्य जप्त करून कारवाई केली. याबाबत लासलगाव पोलीस स्टेशनचे अविनाश सांगळे यांनी फिर्याद दिली. आणि त्यांच्या पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह. बाळासाहेब कांदळकर हे करीत आहे.

### विंचूर येथे १८ वर्षीय तरुणीने केली आत्महत्या



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, सोलापूर :** तालुक्यातील विंचूर येथे एका १८ वर्षीय तरुणीने अज्ञात कारणावरुन घरी पंख्याला ओडणीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना मंगळवारी सकाळी घडली. याची मंद्रूप पोलिसात याबाबत अकस्मात मयत म्हणून नोंद झाली आहे.

श्रेया पुंडलिक गायकवाड (वय १८) राहणार विंचूर (तालुका दक्षिण सोलापूर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे. याबाबत महादेव मारुती गायकवाड (वय ४५), राहणार विंचूर, (ता द. सोलापुर) यांनी मंद्रूप पोलिसात खबर दिली आहे. याबाबत मंद्रूप पोलिसांनी दिलेली अधिक माहिती अशी कि, मयत श्रेया व तिची मोठी बहीण स्नेहल या दोघी आज मंगळवारी सकाळी साडेसात वाजता कॉलेजला सोलापूरला जाण्यासाठी घरातून निघाल्या. मात्र डबा विसरल्याने त्या दोघी पुन्हा घरी परत आल्या. तेव्हा मोठी बहीण स्नेहल ही बाहेर बाथरूमला गेली. तेव्हा श्रेया हीने घरामध्ये जाऊन दरवाजा बंद करून घेतला. राहत्या घरातील पंख्याला ओडणीने गळफास लावून घेतला. मोठी बहीण स्नेहल ही घरी आली दरवाजा बंद असल्याने तिने खिडकीतून डोकावून पाहिले. तेव्हा ती लटकत असल्याचे तिला दिसले. घराशेजारील चुलत भावांना तिने याची माहिती दिली. त्यानंतर सर्वांनी मिळून दरवाजा तोडला. त्यानंतर बेशुद्धावस्थेत तिला ग्रामीण रुग्णालय मंदुप येथे आणले असता ती उपचारा पुर्वीच मयत झाल्याचे डॉक्टरांनी घोषित केले. याबाबत मंद्रूप पोलिसात अकस्मात मयताची नोंद झाली असून अधिक तपास हवालदार शहानूर मुलाणी हे करीत आहेत.

### रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळच्या विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उज्वल यश




**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१५, खंडाळा (सातारा) :** शिरवळ येथील रयत शिक्षण संस्थेच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूल शिरवळ विद्यालयातील पाच विद्यार्थिनींनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे मार्फत फेब्रुवारी २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती व प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये उज्वल यश संपादन केले. पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षे मध्ये कुमारी प्रांजली काळुराम जाधव, प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये कुमारी श्रुतिका चेतन सोनवणे, कुमारी चैतन्या अमोल गोळे, कुमारी सिद्धी विष्णू धुमाळे, कुमारी जान्हवी दीपक लोखंडे यांनी उज्वल यश संपादन केले. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्गशिक्षिका प्रियांका चोबारकर, विषय शिक्षिका रूपाली धनावडे, प्रांजली निंबाळकर, अश्विनी माने, सीमा साळवे तसेच इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांना विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका रूक्साणा नायकवडी, विषय शिक्षिका वासंती घाडगे, विजया शिंदे, पुनम पवार यांचे मार्गदर्शन लाभले.

यशस्वी विद्यार्थ्यांचे त्यांचे पालक व मुख्याध्यापिका यांच्या हस्ते सत्कार करून कौतुक करण्यात आले. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे, पर्यवेक्षिका वासंती घाडगे स्थानिक स्कूल कमिटीचे सर्व सदस्य, शिक्षक पालक संघाचे सर्व सदस्य, पालक तसेच शिक्षक वृंद यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## संपादकीय



## ठाकरे बंधू कोणत्या दिशेने?


राज आणि उद्धव ठाकरे यांच्या एकत्र येण्याने संपूर्ण आठवडा गाजला. हे दोघे आणि त्यांचे पक्ष खरोखरच एकत्र येणार का, मराठीच्या मुद्द्यावर ते दोघे एकत्र आले तरी येणाऱ्या निवडणुकांमध्ये हे दोन पक्ष एकत्र राहणार का, असे अनेक प्रश्न अजूनही अनुत्तरित आहेत, पण या निमित्ताने म हाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले हे मात्र नक्की.

**पवार व ठाकरे ब्रँड!**

महाराष्ट्राच्या राजकारणात पवार आणि ठाकरे या दोन आडनावांना एक वेगळे वलय आहे. शरद पवार गेली साठ वर्षे सार्वजनिक जीवनामध्ये आहेत. त्यांच्यानंतर त्यांची मुलगी, पुतणे व नातूही राजकारणांमध्ये पदावर आहेत. सातत्याने निवडणुकीचे राजकारण करून सत्तेच्या जवळ राहण्याचे धोरण पवार यांनी स्वीकारले आहे. मतभेदांमुळे काही काळ विरोधी पक्षात राहिल्यानंतरही ते पुन्हा सत्ताधाऱ्यांच्या जवळ गेल्याचे इतिहास सांगतो. या प्रवासामध्ये आपल्याबद्दलची अनिश्चितता त्यांनी सातत्याने जपली. पवार कोणत्या क्षणाला काय भूमिका घेतील, याचा अंदाज बांधता येत नाही, असे म्हणतात. या सगळ्या प्रकरणामध्येही पवार थेट व्यक्त झालेले नाहीत. साहजिकच त्यांच्या पुढच्या पावलाबाबत अनिश्चितता आहे. पवार हे राज्यातील महाविकास आघाडीचा कणा आहेत. दोन ठाकरे बंधू एकत्र आल्यानंतर महाविकास आघाडीमध्ये उद्धव ठाकरे यांचे स्थान काय असेल, राज ठाकरे यांना महाविकास आघाडी स्वीकारेल का, काँग्रेसची यात काय भूमिका असेल, यावर महाविकास आघाडीचे भवितव्य अवलंबून आहे. यात पवारांची भूमिका निर्णायक असेल. मध्यंतरी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष एकत्र येण्याची चर्चा सुरू करून देत पवारांनी परिस्थितीचा अंदाज घेऊन पाहिला, पण त्या दिशेने ठोस पावले पडण्याआधीच ठाकरे बंधूंना म राठीचा मुद्दा मिळाला आणि त्यांचा एकत्र येण्याचा मार्ग सुकर झाला.

पवारांचा ब्रँड निवडणुकीच्या राजकारणात तावून सुलाखून निघाला असला, तरी ठाकरे यांचे तसे नाही. अकरा वर्षांपूर्वीपर्यंत कोणीही ठाकरे कधीही निवडणुकीच्या रिंगणात उतरले नव्हते. आपण 'रिमोट कंट्रोल'ची भूमिका बजावतो हे बाळासाहेब ठाकरे जाहीरपणे सांगायचे. त्यांच्यानंतर उद्धव ठाकरे यांनीही बराच काळ तेच सूत्र अंगिकारले. मात्र ठाकरे यांच्या चौथ्या पिढीने निवडणुकीच्या रिंगणात उडी घेत विधानसभा गाठली. मंत्रिपदाचाही अनुभव घेतला. राज ठाकरे यांच्या पुढच्या पिढीनेही निवडणूक लढवून पराभवाचा अनुभव घेतला. गेली अनेक दशके ठाकरे यांचे राजकारण हे प्रामुख्याने मुंबईकेंद्रित राहिले आहे. महाराष्ट्राच्या इतर भागात शिवसेनेला मर्यादित यश मिळत असले तरीही ठाकरे कुटुंबाचा फोकस सातत्याने मुंबई महानगर, तेथील म हापालिका आणि या शहराचे प्रश्न असाच राहिला आहे.

उद्धव ठाकरे यांनी २०१९मध्ये मुख्यमंत्रिपद भूषविले असले, तरी त्या पूर्वीची वीस वर्षे त्यांचे कर्तृत्व प्रामुख्याने मुंबई महापालिकेची सत्ता टिकविणे हेच होते. साहजिकच 'ठाकरे हे निवडणुकीच्या राजकारणात कमी, पण सत्तेच्या चाव्या हातात ठेवणारे कुटुंब' असेच म्हणावे लागेल. या सगळ्याला आणखी एक पदर आहे तो म्हणजे मराठीचा. मुळात बाळासाहेबांनी शिवसेनेची स्थापना केली ती मराठीच्या मुद्द्यावरून. त्यानंतर शिवसेना वाढली तीही मराठीमुळेच. ऐंशीच्या दशकामध्ये भाजपने हिंदुत्वाचा मुद्दा हाती घेतला तेव्हा शिवसेनाप्रमुख त्याबद्दल साशंकच होते; मात्र नव्वदच्या दशकामध्ये मुंबईमध्ये झालेले बॉम्बस्फोट, दंगली, बाबरीविरोधी आंदोलन यामध्ये ठाकरे यांनी हिंदुत्वाची शाल पांघरली, ती २०१९मध्ये महाविकास आघाडीत जाईपर्यंत. त्यानंतरही, आम्ही हिंदुत्व सोडलेले नाही असे उद्धव सातत्याने सांगत असले तरी 'आमचे हिंदुत्व हे भाजपचे हिंदुत्व नाही,' असेही सांगायला ते विसरलेले नाहीत. त्यामुळे आजही ब्रँड ठाकरे हा मराठीशी निगडितच आहे. पुढच्या काळात दोन्ही बंधू तो कसा वापरतात व मराठी माणसाच्या म नात आपले स्थान किती बळकट करतात, यावरच त्यांचे पालिकेती यश अवलंबून आहे.




जि प मराठी शाळेत वर्ग पहिलीपासून खरं शिकायला मिळालं. बालवाडी, अंगणवाडीत गेलो. मात्र तेथील बाईंनी पाटी अन लेखन घेऊन शिकवलं नाही. छान-छान गाणे, गोष्टी शिकवल्या. त्यामुळे शाळेची ओढ लागली. दोन अडीच तास बालवाडीत बसल्यानंतर खायला खाऊ, खिचडी, सुगडी मिळाली की,घरी पळवून यायचो. तेव्हाच्या बालवाड्या आणि अंगणवाड्या म्हणजे नुसते खेळणं असायचं. आता तर प्ले ग्रुप, नर्सरी, केजीं-वन, केजी-टू अशा वर्ग पाहिलीत जाण्यासाठी च्या पायऱ्या आहेत. त्यानंतर वर्ग पहिलीत प्रवेश मिळतो.

मात्र त्यावेळेस सहा वर्षाच्या अगोदर पाच साडेपाच वर्षाला बालवाडी-अंगणवाडी होती. म्हणजे शाळेचं फारसं बंधन नव्हतं. मस्त वर्ग पहिलीपर्यंत खेळायला -बागडायला भेटायचं. असो ! वर्ग पहिलीत गुरुजींनी सुरुवातीला म राठी विषयातील मुळाक्षरे शिकविली. मराठीच्या मुळाक्षरातील पहिलं अक्षर म्हणजे अ असा जो अननसाचा, अजगराचाही होतो किंवा अ पासून सुरू होणाऱ्या इतर वस्तूंचाही होतो. मात्र त्याअगोदर या सर्व अक्षरांपासून मातृभाषेतच काय इतर कोणत्याही भाषेत वाचनात, लिखाणात अज्ञानी होतो. मायची बोलीभाषा मराठी म्हणून नुसतं बोलत होतो. मात्र अक्षरांची ओळख कुठे? नेमकं अला कसं लिहायचं? इतर शब्दांना कसं वाचायचं? घरात माय-बाबा, नातेवाईक, मित्रमंडळी यांच्यासोबत तर आपण माय बाबांनी सांगितल्यामुळे मायबोलीत बोलतोच. अवती भोवतीच्या वस्तूंची ओळख पण होते. परंतु भाषेविषयी व इतर जीवनावश्यक व्यवहारिक ज्ञान मिळवण्यासाठी तथा वाचन लिखाणासाठी अर्थात अज्ञानाकडून ज्ञानाकडे जाण्यासाठी शाळा महत्वाची असते.

मराठी मुळाक्षरांची विभागणी केली तर, स्वर व व्यंजने अशी आहे. स्वर हे बारा होते. व्यंजने ही छत्तीस होती. एकूण ४८ म ुळाक्षरे होती. आता नवीन शिक्षण पद्धती मध्ये व अभ्यासक्रमा मध्ये दोन अक्षरांची भर घातली जसे की, अँ आणिअ ॅम्हणून स्वर बारा ऐवजी चौदा झालेत. सध्या मराठीत एकूण पन्नास म ुळाक्षरे झाली. त्यापैकी चौदा स्वर व छत्तीस व्यंजन म्हणून आता बाराखडीलाचौदाखडी म्हणतात. गुरुजींनी मराठी मुळाक्षरातील पहिल

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**
**मो.नं.९७६३२८२०७७**

अक्षरअशिकवलं अर्थात त्याअगोदर या भाषिक ज्ञानाविषयी अज्ञानी होतो. तर या अपासून अज्ञानपण दूर झाले. तेज्ञपर्यंतच्या अक्षर ओळखीमुळे म्हणजेच ज्ञानापर्यंत...! हे ज्ञान मिळवण्यासाठी ४८ अक्षरांचे अंतर पार करावे लागले. ते समजून घ्यावे लागले.मराठीतील मुळाक्षरे ह्याच अला काना लावून आ म्हणजेच आईशिकलो. की जी मुळातच ज्ञानाचा भांडार आहे. त्यासह पुढील मुळाक्षरे स्वर-व्यंजन यातून बाराखडीचे ज्ञान झाले. या बाराखडीने मराठी या मायबोलीच्या सगळ्या अक्षरांची ओळख करून दिली. अक्षरांची ओळख पटल्यावर सरळ -सरळ साधे अर्थात काना, म ात्रा, वेलांटी, उकाराविनाचे शब्द वाचू लागलो. जसे की, वड, कर, बस, बबन, गणपत वगैरे. गुरुजींनी याच छत्तीस अक्षरांना काना, मात्रा, वेलांटी उकार कसे लावायचे हे शिकवल्यावर, बाबा, आजी, आजोबा, मामा,नकाका या शब्दांची ओळख झाली.

गुरुजींनी सांगितलेल्या मराठीतील पाच ओळीचं शुद्धलेखनामुळे अक्षरांना काना, मात्रा, वेलांटी, उकार कुठे लावायचे हे कळलं. अक्षर लिखाण शिकलो. त्याच बरोबर एक म ात्रा, दोन मात्रे, पहिली वेलांटी, दुसरी वेलांटी, यातील फरक व अक्षर लिखाणातील सौंदर्य लक्षात आले. उच्चारानुसार शब्द लिखाण केल्यामुळे मराठी मायबोलीतील भाषेचे सौंदर्य लक्षात आले. माय मराठी किती प्रगल्भ आहे याची जाणीव झाली. साध्या सरळ शब्दांबरोबर जोडाक्षरेही गुरुजींनी शिकवली. तिसरी-चौथीतील पुस्तकांमध्ये साधारण कवितेत व पाठात हे शब्द आले होते. बोलतांना मायबोली मराठीतून बोललो. पण हे शब्द शुद्ध उच्चारासहित कसे करायचे? जसे की, त्याला, त्यांना, त्यांच्याकडे, म्हणून, आम्ही अशा शब्दांना गुरुजींनी अधोरेखित करण्यास सांगितले. पुनरुच्चार करण्यास सांगितले. त्याला घोकंपट्टी असंही म्हणतात. गुरुजींनी शब्द उच्चार करून, घोकंपट्टी करून घेतली. साधारणतः तिसरी चौथीपर्यंत अशा शब्दांची ओळख पटल्यामुळे, धडा, पाठ वाचायला लागलो. कविता हातवारे करून तालासुरात म्हणू लागलो. छान- छान गोष्टी,बालकथा वाचायला सुरुवात केली. बालकथेतून नितिम ूल्याचे ज्ञान, बोध अर्थात शिकवण मिळाली ती आजही स्मरणात आहे.

याअपासून तरज्ञपर्यंतचे मराठी मुळाक्षरातील स्वर, व्यंजने व बाराखडी शिकल्यामुळे ज्ञानात भर पडली. निरक्षराकडून साक्षर झालो. फारसे ज्ञानी म्हणजे महापुरुषांइतके किंवा बुद्धिमान लोकांइतके नाही परंतु, जीवनजगण्या इतके पुरेसे ज्ञान मिळाले. सामाजिक भान, सामाजिक बांधिलकी याची जाणीव झाली. अच्या अज्ञानरुपी अंधारातूनज्ञच्या ज्ञानापर्यंत अर्थात, मराठी भाषेच्या ज्ञानात भर पडली. मातृभाषा म राठीमुळे अक्षर ओळख होण्यास जास्त लवकर मदत झाली. इतर विषय समजण्यासही हातभार लागला.अवघड विषय समजण्यास सोपे झाले. वाचनाची आवड निर्माण होऊन त्यातून ज्ञान मिळण्यास मदत झाली. हेच नाहीतर, जीवनाचं गणित सुरळीत झालं. अशा या अ पासून ज्ञ पर्यंतच्या अक्षरांमुळे माणूस म्हणून जगण्याची ओळख पटली.

## वाचक पत्र




### प्रार्थना स्थळांवरील भोंगे काढल्याबद्दल सरकारचे अभिनंदन !

मशिदींवरील अनधिकृत भोंगे हा मागील काही वर्षांपासून सरकारसाठी कळीचा मुद्दा बनला होता. यावरून अनेकदा वादही झाले आहेत. मुंबई उच्च न्यायालयानेही यामध्ये हस्तक्षेप करून अनधिकृत भोंगे काढण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते. त्यावर सध्याच्या सरकारने अत्यंत चतुराईने हा प्रश्न मार्गी लावला आहे. मुंबईतील धार्मिक स्थळांवर लावलेले १ हजार ६०८ भोंगे उतरवले गेल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच सभागृहात दिली या भोंग्यांमध्ये मशिदींवरील १ हजार १४९ भोंगे, मंदिरांवरील ४८, चर्चवरील १०, गुरुद्वार ४ आणि अन्य धार्मिक स्थळांवरील १०४ भोंगे मुंबई पोलिसांनी हटवले आहेत. यासह संपूर्ण महाराष्ट्रात असलेल्या विविध धार्मिक स्थळांवरील ३ हजार ३६७ भोंगे पोलिसांनी हटवले आहेत. मुंबईतील भोंगे हटवताना कुठेही धार्मिक तणाव उत्पन्न होणार नाही याची पोलिसांनी विशेष काळजी घेतल्याने माननीय मुख्यमंत्र्यांनी मुंबई पोलिसांचे विशेष कौतुक केले आहे, तर मुंबई उच्च न्यायालयाने महाराष्ट्र शासनाच्या या कृतीविषयी समाधान व्यक्त केले आहे. मुंबईतील भोंगे हटवल्यानंतर आता राज्यभरातील प्रार्थनास्थळांवरील भोंगे हटवणार असल्याची माहीतीही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. राज्य सरकारने दाखवलेले धाडस नक्कीच कौतुकास पात्र असून भविष्यात हे भोंगे काहीनाकाही निमित्त करून पुन्हा प्रार्थना स्थळांवर चढणार नाहीत याची विशेष काळजी सरकारला घ्यावी लागेल. ध्वनी प्रदूषण हा मुंबई सारख्या वर्दळीच्या भागातील महत्वाचा प्रश्न आहे. प्रार्थना स्थळांवरील भोंगे त्यामध्ये भर टाकायचे काम करत होते. शांतता क्षेत्र, शालेय विद्यार्थ्यांच्या परीक्षा, जेष्ठ नागरिक, आजारी माणसे यांची तमा न बाळगता वाजणारे हे भोंगे शहरातील अनेकांसाठी डोकेदुखी ठरले होते त्यामुळे सरकारने या डोकेदुखीतून मुबईवासीयांची मुक्तता केली आहे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

## शिव्या शाप देणारा नव्हे तर आशीर्वाद देणारा व्यवसाय करा !

अवैध दारू साठा जप्त, लाखो रुपयांचा गुटखा जप्त, कोट्यावधी रुपयांचे अमली पदार्थ जप्त, शेतामध्ये गांजा पिकवणारा गजाआड, जुगाराच्या क्लबवर धाड, मटक्याच्या अड्ड्यावर धाड, सावकाराच्या जाचाला कंटाळून आत्म हत्या, अधिक पैशाचे आमिष दाखवून लाखो रुपयाला गंडा, फसवून जमीम बळकावली या आणि अशाप्रकारच्या अनेक बातम्या आपण नेहमीच वर्तमानपत्रात वाचत असतो. दररोजच्या वर्तमानपत्रात अशा प्रकारची एक तरी बातमी आपल्याला वाचायला मिळते. विशेष म्हणजे चार वर्षांपूर्वी जेंव्हा देशभर कोरोना होता.

कोरोनामुळे संपूर्ण देशात लॉक डाऊन घोषित करण्यात आले होते. संपूर्ण देश कुलूपबंद होता तेंव्हा देखील अशाप्रकारच्या बातम्या वाचायला मिळत होत्या. गुटखा, गांजा यासारख्या अमलीपदार्थांवर राज्यात बंदी आहे. राज्यातील काही जिल्ह्यात दारूवर देखील बंदी आहे मात्र बंदी असतानाही काही महाभाग या बंदीची संधी साधून गुटखा, गांजा बाजारात विकायला आणतात. विशेष म्हणजे हे अमली पदार्थ ब्लॅकने विकली जातात म्हणजे अधिक पैसे देऊन ती विकले जातात. ज्या जिल्ह्यात दारूवर बंदी आहे तिथे देखील ब्लॅकने दारू विकली जाते. काही ठिकाणी पोलीस आणि प्रशासनाचे हात ओले करून बेधडकपणे या पदार्थांची विक्री केली जाते. जुगार मटका यासारखे अवैध धंदे देखील असेच बेधडकपणे सुरू असतात. वरिष्ठांकडून दबाव आल्यास



कारवाईचा दिखावा केला जातो, काही दिवसांनी या अवैध व्यवसायांचा पुनश्च हरिओम होतो. कारण संबंधितांनी सोडलेली लाज. केवळ पैसे कमावणे या एकाच उद्देशाने हे महाभाग समाजाचे आरोग्य धोक्यात आणतात. गुटखा खाल्ल्याने दरवर्षी लाखो लोक कर्करोगासारख्या असाध्य रोगाला बळी पडतात. गुटखा खाल्ल्याने कर्करोग होतो हे माहीत असूनही गुटखा बनवणारे गुटखा बनवतात, विकणारे विकतात आणि खाणारे खातात. दारूबंदीचा फक्त फार्स केला जातो. ज्या भागात दारूबंदी आहे त्या भागात तर जास्त दराने दारू विकली जाते.

ड्राय डे च्या दिवशीही दारू ब्लॅकने विकली जाते. दारूमुळे लाखो कुटुंबे उध्वस्त झाली आहेत. दारूमुळे संसाराची राखरांगोळी होते. दारू पील्यामुळे यकृताचा आजार होतो. त्या आजारात जर घरातील कर्त्या पुरुषाचा मृत्यू झाला तर त्याची लेकरे बाळे उघड्यावर पडतात हे माहीत असूनही लोक दारू पितात कारण त्यांना ती सहज उपलब्ध होते. जुगार आणि मटका खेळून अनेकजण कर्जबाजारी झाले आहेत. ही कर्जे फेडण्यासाठी सावकाराकडे जाण्याची वेळ अनेकांवर येते. सावकाराकडून काढलेले कर्ज फेडता न आल्याने काहींनी आत्महत्या केल्या आहेत. मटका जुगाराम ुळे जमीन जुमला विकण्याची वेळ काहींवर आली आहे. हजारो लोकांचे आयुष्य उध्वस्त करणारे, समाजाच्या आरोग्याची नासाडी करणारे कर्करोगासारख्या असाध्य रोगाचा विळखा घालून मृत्यूसमीप नेणारे उद्योग कोणी करू नये अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा असली तरी हे सारे सुरूच आहे याचे कारण हे व्यवसाय करणाऱ्या महाभागांना याचे काही देणेघेणे नाही त्यांना हवाय तो फक्त पैसा. पैशासाठी सर्वकाही ! या उक्तीप्रमाणे हे लोक काम करतात. यांना कोणाच्या संसाराचे देणेघेणे नाही की कोणाच्या आरोग्याचे. यांचा उद्देश केवळ आणि केवळ पैसा कमावणे हाच आहे. आपला पैसा कमावण्याचा व्यवसाय हा कोणाचा तरी संसार उध्वस्त करणारा असेल तर त्या पैशातून आपल्याला समाधान मिळेल का ? याचा विचार संबंधितांनी करावा. ज्यांचा संसार उध्वस्त झालाय, व्यसनांमुळे ज्या घरातील कर्ता पुरुष देवाघरी गेलाय त्या घरातील लोक या लोकांना शिव्याशापच देत असतील. तेंव्हा असा शिव्या शाप मिळणारा व्यवसाय करण्याऐवजी लोकांचे आशीर्वाद मिळतील असा व्यवसाय संबंधितांनी करावा.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## वाचकांचे... मनोगत...



नवी मुंबईतील वाशी येथील' लेटस सेलिब्रेट फिटनेस' संस्थेच्या सौजन्याने सफाई अपना ओ, बिमारी भगा ओ' आयोजित करण्यात आलेल्या अभियानात तृतीय पंथीयांनी सहभाग घेतला. त्यामुळे यांच्यातील आत्मविश्वास दिसला. ते सम ाजातील इतर वर्गा प्रमाणे चांगले जीवन जगू शकतात. त्याकरिता त्यांनीच स्वतः आपल्यातील परिवर्तन घडवून आणावे. म हाराष्ट्र शासनाने यांना अनेक सवलती देऊन इतर वर्गाच्या बरोबरीने नोकरीत प्राधान्य दिले आहे. त्यांना आधार कार्ड, पॅन कार्ड, निवडणूक ओळखपत्र, इत्यादी कागद पत्रे मिळणार आहे.

तसेच, जनगणना होणार आहे. या पंथातील लोकांनी हिडीस प्रथा बंद करून नोकरीच्या संधी शोधाव्या. त्यांच्या जीवनात चांगले बदल होतील. रेल्वे प्रवासात प्रवाशांच्या पुढे हात पसरणे, जंक्शन सिग्नल येथे वाहनचालकांपुढे हात पसरणे काही दिले नाही तर अपशब्द बोलणे, एखाद्या वस्तीत नूतन बालक जन्मले असेल तेथे जाऊन धिंगाणा घालणे बंद करावे. कोणी कोणाला शाप दिले म्हणून कोणाचे काही बिघडत नाही. नाहीतर भारत - पाक देशातील वैर शापाने संपले असते. या भाकड कथा आहेत.

लोकांनी अशा भाकड कथा पासून लांब राहावे. कठोर परिश्रमाशिवाय पर्याय नाही हेच खरे. या समूहातील लोकांना लघु उद्योग, सुरक्षारक्षक, साफसफाईची कामे करून उदरनिर्वाह करता येतील. इतर वर्गातील स्त्री - पुरूषाप्रमाणे स्वत: मध्ये परिवर्तन घडवून आणू शकतील एवढा आत्मविश्वास त्यांनी निर्माण करावा.

**- महादेव गोळवसकर**
**कुर्ला मुंबई**
**मो.९८६९४७६२०९**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## कलगी तुरा लोककलावंतांनी घेतली आ.भास्कर जाधव यांची भेट




**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१५, मुंबई :** कोकणातील कलगी तुरा लोककलावंताची मातृसंस्था असणारी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुबंई संस्थेच्या वतीने सचिव सुधाकर मास्कर यांच्या प्रयत्नाने कोकणचे निडर लोकनेते आमदार भास्करराव जाधव यांची संस्थेच्या तसेच लोककलावंतांच्या विविध मागण्यांसाठी मंगळवार दिनांक १५ जुलै २०२५ रोजी नरीमनपॉइंट -मुंबई येथील शिवालय कार्यालयात भेट घेण्यात आली. सदर भेटीत कलगी तुरा समाज उन्नती मंडळ मुंबई संस्थेला येणाऱ्या विविध अडचणी, तसेच कलगीतुरा लोककलावंत यांना शासकीय योजना तसेच कलाकार मानधन प्रति उद्भवणाऱ्या अडचणी तसेच कलगी तुरा लोककला महोत्सव सुरू होण्यासंदर्भात चर्चा करण्यात आली. आमदार भास्करराव जाधव यांनी सविस्तर समस्या जाणून घेतली व लवकरात लवकर आपल्या समस्यां मार्गस्थ होतील असे उपरोक्त संस्थेच्या प्रतिनिधी याना आश्वाशीत केले. सदर भेटीसाठी कलगी तुरा समाज उन्नती मंडळ -मुंबई संस्थेचे अध्यक्ष : सुरेश ऐनारकर, चिटणीस : सुधाकर मास्कर, माजी अध्यक्ष अनंत तांबे, सदस्य संतोष पारदले, प्रसिध्दी प्रमुख उदय दणदणे आदी प्रतिनिधी मंडळ पदाधिकारी/सदस्य उपस्थित होते.

## महाबळेश्वर रोटरी क्लब व इनरव्हील क्लबचा १७ जुलैला संयुक्तिक पदग्रहण समारंभ





**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.१५, महाबळेश्वर (सातारा) :** सेवा कार्यात अग्रेसर असलेल्या रोटरी क्लब महाबळेश्वर व इनरव्हील क्लब महाबळेश्वर या दोन्ही क्लबचा २०२५-२६ चा संयुक्तिक पदग्रहण समारंभ गुरुवार, १७ जुलै रोजी बाईक रिसॉर्ट येथे संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन रोटरी क्लब व इनरव्हील क्लबच्यावतीने करण्यात आले आहे. महाबळेश्वर रोटरी क्लब अध्यक्षपदाची धुरा मावळते अध्यक्ष रो.दिनेश भिसे यांच्याकडून रो.विजय काळे स्वीकारणार आहे. तर सचिव पदाचा पदभार जेष्ठ उद्योजक रो.महेश कोमटी स्वीकारणार आहेत. महाबळेश्वर इनरव्हील क्लबच्या अध्यक्षपदाचा पदभार मावळत्या अध्यक्षा नम्रता बोधे यांच्याकडून वर्षा पार्टे या व सचिव पदाची जबाबदारी सपना अरोरा स्वीकारणार आहेत. गेली ३ दशके वैद्यकीय क्षेत्रामध्ये कार्यरत असलेले जेष्ठ समाजसेवक खेड येथील प्रसिद्ध डॉ.संजीव धारिया हे या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे असणार असून रोटरीचे असि.गव्हर्नर दीपक बागडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न होणार आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन रोटरी क्लब व इनरव्हील क्लबच्यावतीने करण्यात आले आहे.

## इंस्टाग्रामवरुन आक्षेपार्ह पोस्ट वायरल केल्यामुळे अॅट्रासिटीचा गुन्हा दाखल

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१४, लोहा (नांदेड) :** लोहा तालुक्यातील येळी येथील एका तरुणाने आपल्या मोबाईल इंस्टाग्रामवरुन दोन समाजात तेढ निर्माण करणारी पोस्ट व्हायरल केल्यामुळे त्याच्या विरुद्ध उस्माननगर पोलीस ठाण्यात अॅट्रॉसिटीसह विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर तरुणास ताब्यात घेण्यात आले.

लोहा तालुक्यांतील येळी येथील दिगांबर मारोती ढगे वय २८ यांनी स्वतःच्या मोबाईल अॅप इंस्टाग्राम वरून एक आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल केली. त्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण केल्याच्या कारणांवरून उस्माननगर पोलीस ठाण्यात प्रकाश मदन पवार रा.येळी ता. लोहा येथील असुन यांच्या तक्रारीवरून अॅट्रॉसिटी अॅक्टचा गुन्हा दाखल करण्यात आला असून दरम्यान फौजदार गजानन गाडेकर यांनी गांवात भेट दिली उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत गोसावी पुढील तपास करीत आहेत.

## केज शहरात गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ




**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.१५, केज :** केज शहरामध्ये कानडी रोड येथे गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ दि.१५-०७-२०२५ मंगळवार रोजी रामकृष्ण परमहंस परिवाराच्या गुरुमाई खंदारे आईंच्या हस्ते करण्यात आला.या शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उत्रेश्वर जाधव होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून दिपा काटे, सपना शर्मा, उमा वळसे या उपस्थित होत्या. गुरुकृपा योगा अकॅडमीच्या संचालिका सुवर्णा शेटे यांनी प.पू. खंदारे गुरुजीं पासून प्रेरणा घेऊन योगाभ्यासाचे अध्ययन केले. संचालिकांनी प्रास्ताविकात सांगितले की, सध्याच्या धावपळीच्या जीवन शैलीत महिला पुरुष व बालकांचे आरोग्य, मनस्वास्थ अस्थिर झालेले आहे. प्रत्येकाला स्वतःचे जीवन सुस्थिर करण्यासाठी योग साधना खुप महत्वाची आहे. योग साधनेद्वारे प्रत्येकाने स्वतः सह कुटुंबाच्या आयुष्यात आमुलाग्र बदल होतात. असे प्रतिपादन केले. याप्रसंगी प्रमुख पाहुण्या दिपा काटे यांनी मनोगत व्यक्त केले. तर अध्यक्षीय समारोप उत्रेश्वर जाधव सरांनी केला. यावेळी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना...

## अपघातग्रस्त शेतकऱ्यांना व त्यांच्या वारसांना मिळणार आर्थिक सहाय्य

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१५, चंद्रपूर :** शेती करतांना होणारे अपघात तसेच अपघातामुळे उद्भवणारे अपंगत्व या पार्श्वभूमीवर शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत करण्याच्या उद्देशाने गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा सानुग्रह अनुदान योजना राज्यात राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व वहितीधारक खातेदार शेतकरी तसेच त्यांच्या कुटुंबातील १० ते ७५ वयोगटातील एका सदस्याला अपघात विमा संरक्षण प्रदान करते. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी शासनाचा हा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरत असून अपघाताच्या घटनेनंतर ३० दिवसांच्या आत विहित कागदपत्रांसह संबंधित तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे बंधनकारक आहे.




शेतकऱ्यांचा मृत्यु झाल्यास त्याचे वारसदारांना रुपये दोन लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच वरील अपघातात संबंधित शेतकऱ्याला अपंगत्व आल्यास, अपघातामुळे दोन डोळे अथवा दोन हात किंवा दोन पाय तसेच एक डोळा व एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास दोन लाख रुपये अनुदान मिळणार आहे. तसेच अपघातामुळे एक डोळा अथवा एक हात किंवा एक पाय निकामी झाल्यास एक लाख रुपये आर्थिक मदत अनुज्ञेय आहे. नैसर्गिक मृत्यू, विमा कालावधीपूर्वीचे अपंगत्व, आत्महत्या/प्रयत्न, कायद्याचे उल्लंघन करताना झालेल्या घटना, अंमली पदार्थांच्या प्रभावाखाली अपघात, उष्माघात, भ्रमिष्टपणा, शरिरातील रक्तस्त्राव, युद्ध, सैन्यातील सेवा, इत्यादी प्रकरणी तसेच अन्य कोणत्याही शासकीय विभागाच्या अपघात अनुदान योजनेचा लाभ घेतल्यास सदर योजना अंतर्गत लाभ मिळणार नाही.

या अपघातांचा समावेश योजनेंतर्गत रस्ता / रेल्वे अपघात, पाण्यात बुडून मृत्यू, विषबाधा (जंतुनाशक किंवा अन्य कारणे), विजेचा धक्का, वीज पडून मृत्यू, खून, उंचावरून पडणे, सर्पदंश / विंचूदंश, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यू, जनावरांमुळे झालेला अपघात, बाळंतपणातील मृत्यू, दंगल व इतर कोणताही अपघात प्रकारांसाठी लाभ मिळू शकतो. अनुदान मिळण्याकरीता पती/पत्नी, अविवाहित मुलगी, आई, मुलगा, वडील, सुन इतर कायदेशीर वारस या प्राधान्य क्रमानुसार असतील. आवश्यक कागदपत्रे : प्रस्ताव सादर करतांना ७/१२ उतारा, मृत्यूचा दाखला, गावकामगार तलाठी द्वारा मंजूर वारसांची यादी (गाव नमुना ६ क), ओळखपत्र (आधार/पॅन/बँक पासबुक/मतदार कार्ड), वयाचा दाखला, अपघाताचा अहवाल (एफआयआर, पंचनामा, पोलिस पाटील अहवाल) इत्यादी कागदपत्रे अर्जासोबत आवश्यक असून प्रस्ताव ३० दिवसांत सादर न झाल्यास एका साध्या कागदावर अपघाताची सविस्तर माहिती देऊन तात्पुरता अर्ज सादर करता येतो.

## गाव तेथे शाखा पॅटर्न व सदस्य नोंदणी अभियान राबवणार : शिवाजी महाजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१५, अमळनेर :** अमळनेर तालुक्यातील आदर्श गाव देवगाव देवळी येथील युवक, सामाजिक कार्यात आपल्या कार्याचा ठसा उमटवत सदैव सामाजिक कार्यात अग्रेसर राहणारे, उत्तर महाराष्ट्रात युवकांचे मोठ्या प्रमाणावर संघटन करणारे शिवाजी महाजन यांना त्यांचा सामाजिक कार्याची दखल घेऊन नाशिक येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित राज्यस्तरीय कार्यकारणी बैठकीत महाराष्ट्र माळी समाज महासंघाचे प्रदेश अध्यक्ष अनिल महाजन व विश्वस्त यांनी सर्वानुमते शिवाजी महाजन यांची नाशिक विभागीय युवक अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली असून उत्तर महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात युवकांचे संघटक करून समाजाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी नेहमी कटिबद्ध राहील, तसेच लवकरच गाव तेथे शाखा हे पॅटर्न राबवणार असे शिवाजी महाजन यांनी सांगितले. **शिवाजी महाजन हे दैनिक अक्षराजचे अमळनेर तालुका प्रतिनिधी आहेत.**




महाराष्ट्र माळी समाज महासंघाच्या नाशिक येथील झालेल्या बैठकीत खालील पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. कांताबाई पांढरे (विश्वस्त) पुणे, प्रवीण महाजन सचिव, महाराष्ट्र माळी समाज महासंघ विश्वस्त बॉडी, मनोहर शिवाजी महाले युवक आघाडी जिल्हाध्यक्ष जळगाव, प्रवीण गणपत पाटील जिल्हाध्यक्ष अध्यात्मिक आघाडी नाशिक जिल्हा, उत्तम कचरू कांबळे जिल्हाध्यक्ष संभाजीनगर, त्र्यंबक शामराव महाजन जिल्हाध्यक्ष जळगाव, संदीप सुधाकर खंडारे जिल्हाध्यक्ष पुणे, अजय नगराज महाले जिल्हा शहर युवक अध्यक्ष नाशिक, सुभाष उत्तम महाजन जळगाव जिल्हा संघटक, प्रवीण वंजी माळी अमळनेर तालुका अध्यक्ष, सचिन भैय्या राव माळी युवक उपाध्यक्ष जळगाव, लक्ष्मीकांत शेखर निकम नाशिक शहर युवक उपाध्यक्ष , अनिल हरिभाऊ सोनवणे कोपरगाव तालुका अध्यक्ष, चंद्रकांत नारायण गायकवाड जिल्हा संघटक नाशिक, बबन दादाजी शेवाळे नाशिक जिल्हा अध्यक्ष उद्योजक आघाडी, नितीन रमेश महाजन जळगाव शहर महानगर प्रमुख, शिवाजी विनायक महाजन युवक अध्यक्ष नाशिक विभागीय, सचिन खलाणे पालघर जिल्हाध्यक्ष युवक आघाडी, राजेंद्र धर्मा महाले धुळे ग्रामीण युवक उपाध्यक्ष जिल्हा, खुशाल रघुनाथ माळी धुळे ग्रामीण जिल्हा संघटक, साहेबराव विठ्ठल माळी जिल्हा संपर्कप्रमुख धुळे, चिंतामण राजाराम महाले धुळे तालुका संघटक, लक्ष्मण शेवाळे कळवण तालुका अध्यक्ष अध्यात्मिक आघाडी , ललित पाटील नाशिक शहर संघटक, प्रकाश हिम्मतराव सोनवणे विभागीय संघटक नाशिक विभागीय. अशी कार्यकारणी जाहीर करण्यात आली.

# पाणी पातळी नियंत्रणासाठी कोयना धरणातून पाणी सोडले...

## नदीकाठावरील नागरिकांना सतर्कतेचा इशारा...

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१५, पाटण :** कोयना धरण छत्रपती शिवाजी महाराज जलाशय क्षेत्रासह सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागात संततधार सुरू असलेल्या पावसाने कोयना धरणाची पाणी पातळी २१३७.०३ फूट(६५१.४३४ मी) झाली असून ७६.५२ टिएमसी झाली आहे.

धरण ७२.७० टक्के भरले असल्याने धरणातील पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी मंगळवार दि. १५ जुलै रोजी सकाळी ११ वा. धरणाचे वरील सहा वक्र दरवाजे १ फूट ६ इंचाने उघडून ३,४०० क्युसेक्स विसर्ग होत आहे. कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे दोन्ही युनिट सुरु असून त्याद्वारे पायथा २१०० क्युसेस विसर्ग सुरु आहे. एकंदरीत नदीपात्रात ५ हजार ५०० क्युसेक्स पाणी कोयना नदीपात्रात सोडण्यात आले आहे.



धरण परिसरात पावसाची धुवांधार सुरु असलेल्या पहिल्यांदा च जुलै च्या मध्यांतरावरती धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडून पाणी सोडण्यात येत आहे. छ. शिवाजी महाराज जलाशयामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक सध्या २५ हजार ४७८ प्रती सेंकद क्युसेस २.२० टीएमसी इतकी आहे. कोयना, नवजा, महाबळेश्वर याठिकाणी पावसाचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात असल्याने जलाशयामध्ये येणाऱ्या पाण्याची आवक वाढली आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाऊस, धरणामध्ये येणारी आवक आणि उर्वरित मान्सून कालावधी विचारात घेता कोयना जलाशय परिचलन सूचीनुसार धरणातून पाणी सोडण्यात आल्याचे धरण व्यवस्थापनाने सांगितले आहे. तसेच नदी काठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

## शिवसेना विभागप्रमुख नाकती यांच्या पाठपुराव्यामुळे महावितरणच्या बिलामध्ये सवलत

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि .१५, नौपाडा (ठाणे) :** नौपाडा विभागातील स्थानिक रहिवासी किरण टिळक यांना मागील वर्षाचे नियमित मासिक महावितरण बिल येत होते व त्यांनी ती रक्कम वेळोवेळी भरली सुद्धा होती. परंतु वर्षअखेर पुन्हा सत्तावन्न हजार रुपयांचे वेगळे बिल त्याच वर्षाचे आले. महावितरण कडून सांगण्यात आले की, आपल्या मीटर मध्ये बिघाड झाल्याने रीडिंग कमी दाखवण्यात आली.



हि तक्रार नौपाडा विभागाचे शिवसेनेचे विभाग प्रमुख किरण नाकती यांच्याकडे टिळक यांनी केली. त्यांना घेऊन स्वतः विभागप्रमुख व शिवसेनेचे एक शिष्टमंडळ महावितरण विभागाचे अधिकारी मसने यांना भेटले. दर महिन्याला आपल्या विभागाचे कर्मचारी जर नियमित रीडिंग घेत होते तर मग तेव्हाच हि गोष्ट त्यांच्या लक्षात यायला हवी होती.

त्यामुळे एक वर्षानंतर जे नियमित बिल भरताना सुद्धा दंड आकारून इतकी मोठी रक्कम भरायला लावणं हे चुकीचे आहे. याचा भुर्दंड ग्राहकांनी का घ्यायचा. असा जाब विचारत किरण नाकती यांनी या रकमेवर साठ टक्के सवलत घेऊन त्या ग्राहकांना दिलासा दिला. त्यांनी शिवसेनेचे तसेच किरण नाकती व सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले.

# गणेशोत्सवासाठी कोकणातील चाकरमान्यांकरीता एस.टी महामंडळाची मोठी घोषणा



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१५, मुंबई :** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच कोकणातील चाकरमान्यांचा आनंद गगनात मावेनासा होतो. आपल्या लाडक्या बाप्पााच्या स्वागतासाठी प्रत्येक चाकरमानी हा कोकणात गावी जात असतो.

आता कोकणात जाणाऱ्या गणेशभक्तांसाठी एक आनंदाची बातमी आहे. गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी एसटी महामंडळ पूर्णपणे सज्ज झाले आहे. यंदाच्या गणेशोत्सवासाठी तब्बल ५ हजार जादा गाड्या सोडण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. येत्या २७ ऑगस्ट रोजी गणपती बाप्पाचे आगमन होत असून यासाठी खास २३ ऑगस्ट ते ७ सप्टेंबर या कालावधीत एसटी बस उपलब्ध असणार आहेत. परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी याबद्दलची माहिती दिली.

### ५ हजार जादा बसेस कोकणातील रस्त्यांवर धावणार

नुकतंच एसटी महामंडळाची एक बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीत महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांच्यासह एसटीचे सर्व खातेप्रमुख उपस्थित होते. या बैठकीत प्रताप सरनाईक यांनी भाष्य केले. गणपती उत्सव हा कोकणच्या चाकरमान्यांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा सण आहे. गणपती बाप्पा, कोकणचा चाकरमानी आणि एसटी यांचे एक अतूट नाते आहे. त्यामुळे दरवर्षी गणपती उत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांच्या सेवेसाठी एसटी महामंडळ नफा-तोट्याचा विचार न करता धावत असते. यावर्षी सुमारे ५ हजार जादा बसेस कोकणातील रस्त्यांवर धावणार आहेत. प्रवाशांच्या सोयीसाठी या बसेसचे आरक्षण एसटीच्या अधिकृत संकेतस्थळ पीिलिश्रळल.ीऑंलेऑ.लो वर उपलब्ध करून देण्यात येत आहे. याशिवाय, बसस्थानकांवरून किंवा ॲपव्दारे देखील आरक्षण करता येईल, अशी माहिती प्रताप सरनाईक यांनी दिली.

नुकत्याच पार पडलेल्या आषाढी एकादशीच्या यात्रेसाठीही एसटी महामंडळाने ५ हजार २०० जादा बसेस सोडल्या होत्या. ज्याला भाविक आणि प्रवाशांकडून अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला होता. त्याच यशानंतर, गणेशोत्सवासाठीही एसटीने ५ हजार जादा बसेस उपलब्ध करून देण्याचे निश्चित केले आहे. या जादा बसेसमध्ये व्यक्तिगत आरक्षणासोबतच गट आरक्षणाची सोयही उपलब्ध असेल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, अमृत ज्येष्ठ नागरिकांना १०० टक्के तिकिट दरात सवलत मिळणार आहे, तर ज्येष्ठ नागरिकांना आणि महिलांना ५० टक्के तिकिट दरात सवलत दिली जाणार आहे. गट आरक्षणाची प्रक्रिया २२ जुलैपासून सुरू होत आहे.

दरम्यान येत्या २३ ऑगस्टपासून मुंबई, ठाणे, पालघर या विभागातील प्रमुख बसस्थानकातून जादा बसेस कोकणासाठी सुटतील. गेल्या वर्षी ४ हजार ३०० बसेस सोडण्यात आल्या होत्या, त्या तुलनेत यंदा ७०० बसेसची वाढ करण्यात आली आहे. गणेशोत्सवादरम्यान एसटीची वाहतूक सुरळीत चालावी यासाठी बसस्थानके आणि बसथांब्यावर एसटीचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी अहोरात्र कार्यरत राहणार आहेत. तसेच, कोकणातील महामार्गांवर ठिकठिकाणी वाहनदुरुस्ती पथके देखील तैनात करण्यात येणार आहेत, जेणेकरून प्रवाशांना कोणतीही अडचण येऊ नये, असेही प्रताप सरनाईक यांनी सांगितले.

# प्रदूषण मंडळाने ठाणे महापालिकेला ठोठावला कोट्यावधींचा दंड

**अक्षराज संजय पंडित**

**दि.१५, ठाणे :** दिवा प्रभागातील डंपिंग ग्राउंडमध्ये गेल्या सात वर्षांपासून ठाणे महापालिकेकडून सातत्याने बेकायदेशीर कचरा टाकण्यात येत होता. या प्रकारामुळे परिसरातील खारफुटीचे जैवविविधतेचे मोठे नुकसान, दुर्गंधी, लेट्सम‌ुळे भूजल प्रदूषण आणि स्थानिक नागरिकांच्या आरोग्यावर मोठा परिणाम झाला.



या गंभीर प्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठाणे महापालिकेला तब्बल १०.२ कोटींचा दंड ठोठावला आहे. दरम्यान ही कारवाई म्हणजे दिवा परिसरातील जनतेचा संघर्ष आणि वनशक्ती फाउंडेशनचे संस्थापक स्टॅलिन दयानंद या सारख्या पर्यावरण प्रेमी संस्थांचा विजय आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष या लढ्याशी एकात्म आहे. आम्ही सुरुवातीपासूनच या प्रश्नावर सातत्याने आवाज उठवत आलो असून, आजची ही कारवाई म्हणजे जनतेच्या आवाजाची दखल घेतली गेली, हे स्पष्ट आहे.

या संपूर्ण प्रकरणात टीएमसीने केवळ पर्यावरणाची नव्हे, तर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचीही पायमल्ली केली आहे. आता यापुढे महापालिकेने डंपिंग ग्राउंड परिसरातील सर्व बेकायदेशीर कचरा त्वरित साफ करण्यात यावा. प्रदूषित भूजल व परिसराचे वैज्ञानिक पुनर्वसन केले जावे.

आरोग्यधोका निर्माण झालेल्या परिसरातील नागरिकांसाठी वैद्यकीय शिबिरे लावावी. दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ शिस्तभंगाची कार्यवाही केली जावी. भविष्यात अशा प्रकारचा पर्यावरण विनाश टाळण्यासाठी पारदर्शक आणि जनतेच्या सल्ल्याने धोरण आखावे. अशा प्रकारची मागणी दिव्यातील नागरिकांनी केली आहे.

दरम्यान शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष हा नेहमीच पर्यावरण रक्षण, सार्वजनिक आरोग्य आणि प्रशासनाची जबाबदारी या मुद्द्यांवर प्रामाणिकपणे काम करत आला आहे. यापुढे ही आम्ही दिवा व परिसरातील जनतेच्या प्रत्येक संघर्षात त्यांच्या सोबत आहोत. असे कल्याण कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मुंडे यांनी म्हटले आहे.

# ३२ मजली चढाई इमारत स्पर्धेत रौप्य पदक पटकविले

## चिचोलीच्या फायर वूमेन उन्नती चिलकेवारचा अमेरिकेत डंका

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१५, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या सावनेर तालुक्यातील चिचोली (खापरखेडा) जि.प.सर्कल मधून अनेक प्रतिभावंत खेळाडूंनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले नाव कोरले आहे. आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू उमेश यादव चनकापूर परिसरातील आहे. क्रिकेटपटू उमेश यादव यांच्या पाठोपाठ चिचोली(खापरखेडा) वार्ड क्रमांक १ परिसरात राहणाऱ्या फायर वूमेन उन्नती अजय चिलकेवार हिने अमेरिकेत डंका वाजविला आहे.

उन्नतीने जिद्द व मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर ३२ मजली चढाई इमारत स्पर्धेत चक्क रौप्य पदक पटकविले असून खापरखेडा वासीयांची मान गौरवाने उंचविली आहे.

अमेरिकेतील अलाबामा प्रांत बर्मिंगहॅम येथे जागतिक पोलीस व अग्निशमन क्रिडा स्पर्धा २०२५ नुकत्याच पार पडल्या. सदर स्पर्धेत १८ ते २९ वयोगटातील स्पर्धक सहभागी झाले होते. या स्पर्धेत मुंबई येथील अग्निशमन दलाचे प्रतिनिधित्व चिचोली वार्ड क्रमांक १ येथे राहणाऱ्या उन्नती चिलकेवार हिने केले होते. उन्नतीने स्टेअर रेस रन (३२ मजली चढाई इमारत) या स्पर्धेत भाग घेतला होता.



५ मिनिट ३९ सेकंदात ३२ मजली इमारत अंतर पार करून उन्नती ने रौप्यपदक पटकावले.

या स्पर्धेसाठी २० दिवसांचे विशेष प्रशिक्षण दिल्ली येथे देण्यात आले होते. उन्नती सद्या कांदिवली मुंबई येथे फायरमॅन पदावर कार्यरत आहे. उन्नतीने १० व १२ वीचे शिक्षण महाराष्ट्र विद्यालय खापरखेडा येथे पूर्ण केले असून बी.पी.ई चे शिक्षण शाररिक शिक्षण महाविद्यालय कोराडी येथे पूर्ण केले आहे.

उन्नतीची आई वैशाली चिलकेवार ह्या शंकरराव चव्हाण इंग्लिश स्कुल खापरखेडा येथे सहाय्यक शिक्षिका आहेत तर वडील एका कंपनीत कार्यरत आहेत. उन्नतीच्या उल्लेखनीय यशाबद्दल दिवाकर घेर, अमर जैन, सुनील जालंदर, केशव पानतावणे, कपिल वानखेडे, राजेश खंडारे, मयूर तिरपुडे, विलास महल्ले, धीरज बोरकर, अभय मिश्रा, पवन पहाडे, राकेश बर्वे, सौरभ सिंग, आशिष टेड्डेवार, अक्षय सुवाडोर आदींनी अभिनंदन केले आहे.

# 'अपरंपार' येथे कायमस्वरूपी पाण्याची सोय; खा.चव्हाण यांच्या प्रयत्नातून रोहित्र उभारणी

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.१५, मुदखेड (नांदेड) :** खासदार रवींद्र चव्हाण यांनी अर्धापूर तालुक्यांतील जागृत देवस्थान 'अपरंपार स्वामी मठ' व महादेव मंदिराच्या विहिरीच्या पाण्यासाठी थ्री फेज 'रोहित्र' उभे केल्याने अपरंपार स्वामी मठावरील अनेक वर्षांपासूनचा पाण्याचा प्रश्न सुटला आहे. या निमित्ताने मठाचे स्वामी रेवण सिद्ध गुरु अपरंपारय्या महाराज यांनी खा. रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन आभार मानले. अर्धापूर मुदखेड व हदगाव तालुक्याच्या केंद्रबिंदूवर असणारे घाट माथ्यावरील 'अपरंपार स्वामी' महाराजांचा मठ व तेथील निसर्गरम्य वातावरणातील महादेव मंदिर नांदेड जिल्ह्यातील लाखो भाविक भक्तांचे श्रद्धास्थान आहे. शेकडो वर्षांपासून तेथील मठावर भाविक भक्तांची श्रद्धा आहे. दरवर्षी श्रावण महिन्यात लाखो भाविक भक्त घाट माथ्यावरील अपरंपार स्वामी महाराजांच्या मठात दर्शनासाठी येत असतात. संपूर्ण श्रावण महिन्यात दररोज येणाऱ्या प्रत्येक भाविकांसाठी भोजन प्रसाद



असतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याची सोय आवश्यक असते. गेल्या अनेक वर्षांपासून घाटमाथ्यावरील रस्ता कठीण असल्यामुळे टँकरने पाणी पुरवठा करणे घातक ठरत होते. त्यानंतर देवस्थानाच्या पायथ्याशी नित्यानंद महाराज यांच्या कडून विहीर खोदण्यात आली तर शेंबोली, पांढरवाडी, पाटनूर येथील ग्रामस्थांनी लोक सहभागातून पाईपलाईन उभी केली.

लोकसभा निवडणुकीच्या काळात कै.खा.वसंतराव चव्हाण अपरंपार देवस्थानच्या दर्शनासाठी आले असता त्यांना पाण्याच्या प्रश्नाविषयी रोहित्री उभारणीची अपेक्षा भक्तगणांकडून करण्यात आली होती. हीच बाब लक्षात ठेवून त्यांचे सुपुत्र खा.रवींद्र चव्हाण यांनी कर्तव्यपूर्तीतून कायम स्वरूपी पाणी पुरवठ्यासाठी थ्री फेज 'रोहित्री'ची उभारणी केली आहे. त्यामुळे आता थेट अपरंपार स्वामी मठावर कायमस्वरूपी पाणीपुरवठा सुरु झाला आहे. त्यामुळे अपरंपार मठाला आता टँकर पासून मुक्ती मिळाली आहे. यानिमित्त अपरंपार मठाचे स्वामी रेवण सिद्ध गुरु अपरंपारय्या महाराज यांनी खा. रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन आभार मानले. यावेळी त्यांनी महाराजांचे आशीर्वाद घेत 'तुम्ही एखादे काम सांगावे आणि आम्ही ते करू नये असे कसे शक्य ? आपला आदेश कायम शिरस्त असेल,' असे स्पष्टीकरण दिले. यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष माजी आ.हनमंतराव बेटमोगरेकर, कार्याध्यक्ष राजेश पावडे, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हनमंतराव पाटील शेलगावकर, प्रा.संदीपकुमार देशमुख, डॉ.शैलेश पांडागळे, बालाजीराव कल्याणकर आदी उपस्थित होते.

# थोडक्यात

## आधार प्रतिष्ठानच्या वृक्षसंवर्धन स्पर्धेचा मनगोळी शाळेत शुभारंभ



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१५, सोलापूर :** दक्षिण सोलापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मनगोळी येथे मंगळवार, दिनांक १५ जुलै २०२५ रोजी आधार प्रतिष्ठान सोलापूर आयोजित वृक्षसंवर्धन स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी शासनाच्या एक पेड माँ के नाम या अभियानांतर्गत शाळेतील ११० विद्यार्थी स्पर्धकांना केशर आंब्याची रोपे विस्तार अधिकारी अय्युब कलबुर्गी व केंद्रप्रमुख आमसिध्द म्हेत्रे या मान्यवरांच्या हस्ते वितरीत करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लाडलेमशाक शेख होते तर प्रमुख उपस्थिती उपाध्यक्ष लक्ष्मी हातेकर, सरपंच तेजस्विनी गायकवाड, ग्रा.पं.सदस्या नूरजहान शेख, आधार प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर नळे, सचिव प्रा.डॉ.जवाहर मोरे, खजिनदार कलप्पा हेळवी व संचालक आप्पासाहेब कोळी यांची होती.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक करताना सहशिक्षक राजेंद्र कांबळे यांनी स्पर्धेचे स्वरूप व नियम सांगताना हि स्पर्धा वार्षिक असून दिलेले झाड हे वर्षभर वाढवायचे आहे. ज्यांचे झाड उत्कृष्ट वाढेल अशा प्रथम तीन विजेत्यांना रोख पारितोषिके दिली जाणार आहेत. शिवाय सहभागी स्पर्धकांना भेटवस्तू देण्यात येणार आहेत.त्यानंतर शंकर नळे यांनी प्रतिष्ठानच्या कार्याची माहिती दिली. जवाहर मोरे यांनी स्पर्धा यशस्वी करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. मार्गदर्शन करताना कलबुर्गी व म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांनी व पालकांनी मिळून ही स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडून पर्यावरणाचे संरक्षण करण्यास मदत करावी असे सांगितले. यावेळी मल्लिकार्जुन पाटील व लक्ष्मी हातेकर यांनी शाळेसाठी दोन पंखे भेट दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजकुमार म्हेत्रे यांनी केले तर आभार मुख्याध्यापक सुरेश डफळे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहशिक्षक शिवकांत साबळे, आनंदराव शिंदे, दत्तात्रय हांडे यांनी अथक परिश्रम घेतले.

## मुक्त विद्यापीठात 'मीडिया ग्राफिक्स व ॲनिमेशन' पदवी शिक्षणक्रम



**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१५, ठाणे :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ आणि सर्जनशील ग्राफिक्स- ॲनिमेशन तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत पुणे येथील सृजन विद्याव्रत प्रा.लि. यांच्यात 'बी.एस्सी. इन मीडिया ग्राफिक्स आणि ॲनिमेशन' या शिक्षणक्रम सहकार्याबाबत सामंजस्य करार करण्यात आला आहे. त्यानुसार कौशल्याधारित व उद्योगाभिमुख असणारा हा शिक्षणक्रम महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी परवडणाऱ्या दरात उपलब्ध होणार आहे.याप्रसंगी बोलताना विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.संजीव सोनवणे म्हणाले की, हा करार विद्यापीठाच्या कौशल्याधारित शिक्षण व उद्योगसंलग्न अभ्यासक्रमांच्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे. मीडिया व ॲनिमेशनसारख्या गतिमान आणि सर्जनशील क्षेत्रात शिक्षण घेऊन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर करिअर घडवण्याची दिशा मिळणार असल्याचे देखील ते म्हणाले. 'सृजन विद्याव्रत' चे संचालक संतोष रासकर यांनी या शिक्षणक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ पदवीच प्राप्त होणार नसून उद्योगात प्रत्यक्ष वापरली जाणारी कौशल्य आत्मसात होतील. परिणामी त्यांच्यासाठी रोजगाराच्या अधिक संधी निर्माण होतील, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी फोईबसचे ॲनिमेशनचे कार्यकारी अधिकारी राहुल बक्षी, विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड, निरंतर शिक्षण विद्याशाखाचे संचालक डॉ.जयदीप निकम, सोनाली पाटील, सुजाता मोरे, मनोहर पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.सदर शिक्षणक्रम केंद्र शासनाच्या दूरस्थ शिक्षण मंडळाच्या (डीईबी - डीस्टंस एज्युकेशन ब्युरो) मार्गदर्शक तत्त्वांनुसार राबविण्यात येणार असून त्यासाठी ऑनलाईन व मिश्र (ब्लेंडेड) शिक्षण पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. विद्यार्थ्यांना उद्योगमान्य सॉफ्टवेअरचा सराव, प्रत्यक्ष प्रकल्प, असाइनमेंट्स, केस स्टडीज व इंटर्नशिपच्या माध्यमातून अनुभवाधारित शिक्षण दिले जाणार आहे. विद्यापीठ अभ्यासक्रम रचना, प्रवेशप्रक्रिया, परीक्षा आयोजन, प्रमाणपत्र वितरण आणि नियामक संस्थांच्या नियमांचे पालन बघेन तर तर सृजन विद्याव्रत संस्था प्रशिक्षकांची नेमणूक, डिजिटल साहित्य निर्मिती, प्रकल्प मूल्यांकन आणि विद्यार्थ्यांना रोजगार नियुक्ती (प्लेसमेंट) व आंतरवासियता (इंटर्नशिप) सेवा पुरवेल.

## चैन स्नॅचिंग करणाऱ्या आरोपीला कोळसेवाडी पोलिसांनी ठोकल्या बेड्या




**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.१५, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी पोलीस ठाण्याच्या आधी दिनांक १४ जुलै २०२५ रोजी गणेशवाडी येथील सरस्वती विद्यामंदिर शाळेजवळ राहणारी फिर्यादी नाव ईला बरून घोष वय ४८ वर्ष राहणारे सरस्वती स्कूल जवळ गणेश वाडी कल्याण पूर्व ही महिला घरातील कचरा टाकण्यासाठी कचराकुंडी जवळ टाकून घरी परत येत असताना एक अनोळखी इसमाने त्यांचा गळ्यातील ०८ ग्रामवदलाची सोन्याची चैन खेचून तो कल्याण रेल्वे ट्रॅकच्या दिशेने पळून गेला. म्हणून त्या फिर्यादीने कोळसेवाडी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार नोंदवण्यात आले होते. सदर गुन्हाचे तपास पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सह पोलीस निरीक्षक संदीप भालेराव व त्यांचे पथक असे सदर घटनास्थळी जाऊन सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे गुन्ह्यातील अनोळखी आरोपीचं नाव निष्पन्न करून आरोपी नाव प्रीतम रमेश जाधव वय ३१ राहणारा मिलिंद नगर कल्याण पूर्व याला पुण्यात अटक करून गुन्ह्यातील ०८ ग्राम वजनाची सोन्याची चैन हस्तगत करण्यात आली.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त, परीमंडळ ३, कल्याण अतुल झेंडे, व सहा. पोलीस आयुक्त कल्याण विभाग कल्याणजी घेटे यांचे मार्गदर्शनाखाली कोळसेवाडी पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक गणेश न्हायदे, पो.निरी प्रशासन साबाजी नाईक यांचे सुचनेप्रमाणे सहा.पो निरी संदिप भालेराव, पोहवा ५०३ वाघ, पोहवा २१५ जाधव, पोहवा ७७३ कदम, पो.शि २१३७ सोनवणे, पो शि १५२६ इंगळे यांचे पथकाने केली आहे.